RNI No: MAHMAR/2004/13776 ✸ Postal Registration No: MH / MR / NW-35 / 2014-2016
Published On: 12 Nov 2014 ✸ Posted at Kandivli(W) Post Office, Mumbai on 15 Nov 2014

# अजायब ✸ बानी

मराठी मासिक पत्रिका

वर्ष : बारा | अंक : पाचवा | नोव्हेंबर २०१४




**धन्य अजायब** (सत्संगाच्या कार्यक्रमांची माहिती) 4

**अमृतवेळ** (ध्यान-अभ्यासापूर्वी दिलेला संदेश) 5

**जगीर कौर** (एक अविस्मरणिय घटनेचे वर्णन) 7

**कलियुगातील जीव** (सत्संग) 11

**अनमोल वचन** (कार्यक्रम अखेरीस दिलेला संदेश) 30


मालक, मुद्रक व प्रकाशक श्री दामोदर सिनकर व संपादक श्रीमती रेवती सिनकर यांनी अजायब बानी हे मराठी मासिक नवरंग ऑफसेट 125, वडाला उद्योग भवन, मुंबई - 400031 येथे छापून सी/503 म्हात्रे प्लाझा, महात्मा गांधी रोड, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई - 400067 फोन नं: (022) 24965000 येथून प्रसिद्ध केले.

# धन्य अजायब



परमसंत अजायब सिंहजी महाराजांच्या अपार दयेने **मुंबई शहरात** त्यांच्या मधुर आठवणीत **७ ते ११ जानेवारी २०१५** रोजी सत्संगाचा कार्यक्रम आयोजित केला जात आहे. हा कार्यक्रम भुराभाई आरोग्य भुवन, शांतीलाल मोदी मार्ग, मयुर सिनेमा समोर, कांदिवली (प) मुंबई ६७ या पत्यावर होईल. रविवार दिनांक **११ जानेवारी २०१५** रोजी बाबाजींचा **भंडारा** साजरा केला जाईल. इतर दिवशी खालील वेळापत्रकानुसार कार्यक्रम होईल:

| | | | | |
|---|---|---|---|---|
| पहाटे | ३:०० | ते | ५:३० | ध्यान–अभ्यास |
| सकाळी | ७:०० | ते | ८:०० | ध्यान–अभ्यास |
| सकाळी | ९:३० | ते | १०:३० | ध्यान–अभ्यास |
| सकाळी | ११:०० | ते | १२:०० | सत्संग |
| दुपारी | १२:०० | ते | १२:५० | ध्यान–अभ्यास |
| दुपारी | ४:०० | ते | ५:०० | ध्यान–अभ्यास |
| संध्याकाळी | ५:३० | ते | ७:०० | प्रश्नोत्तरे व सत्संग |
| रात्री | ८:१५ | ते | ८:४५ | भजने गाण्याचा कार्यक्रम |

सर्व बंधू–भगिनींनी कार्यक्रमात सहभागी होऊन नामस्मरणाचा व संतवचनांचा लाभ घ्यावा ही नम्र विनंती.

---

परमसंत अजायब सिंह महाराजांच्या अपार दयेने **संतबानी आश्रम, १६ पी. एस. राजस्थान** येथे **सत्संगाचे कार्यक्रम** : **२८ ते ३० नोव्हेंबर २०१४, २६ ते २८ डिसेंबर २०१४, २ ते ६ फेब्रुवारी २०१५**

# अमृतवेळ

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी ध्यान-अभ्यासास बसविण्यापूर्वी प्रेमींना दिलेला संदेश - १६पी एस राजस्थान



*सतगुरु सच्चे मेरे दाता दर तेरे ते आ गए।*

सर्व संतांनी आपल्या लिखाणात मान्य केले आहे की बाह्यजगातील कोणत्याही शब्दांत गुरुंचा महिमा आणि गुरुंची दया यांचे वर्णन केले जाऊ शकत नाही. गुरुंचा महिमा जाणून घेण्यासाठी आपणांस अंतर्यात जाण्याची गरज असते की गुरु कोणत्या देशाचे वासी आहेत? आपण तेथे जाऊन त्यांचा महिमा पाहिल्यानंतरच आपणांस समजते की कशा प्रकारे ते आपल्या सारख्या मलिन जीवांमध्ये येऊन राहिले.

संत आपणांस प्रेमाने समजावतात की याजगात गोळा करण्याजोगी गोष्ट म्हणजे भक्तीचे धन होय. हे धन मृत्युपश्चात आपल्या सोबत जाईल. भक्ती अमूल्य धन आहे, जे विकत घेता येत नाही. भक्ती व गुरुंचे प्रेम आपल्यामधील

काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार बाहेर काढून टाकते. शांती नामात आहे, परंतु आपण भक्तीचे धन, नाम स्वत:हून प्राप्त करू शकत नाही; आपण स्वत:हून अंतर्यात जाऊ शकत नाही.

काळ शक्तीने अंतर्यात अनेक भ्रमात पाडणारे जाळे रचलेले आहे. आपणांस कल्पना नसते की अंतर्यात कोणता आवाज पकडला पाहिजे व कोणता आवाज सोडून दिला पाहिजे? कोणती ज्योत पकडली पाहिजे व कोणती सोडून दिली पाहिजे, कारण काळशक्तीने खालच्या चक्रांमध्ये आपली ज्योत निर्माण केलेली आहे. काळशक्तीने अंतर्यातील अस्सल गोष्टींची नक्कल तयार केलेली आहे. गुरु नानकदेवजी म्हणतात:

***अंदर सुरत शब्द धुन जागे, सतगुरू झगड़ निबेड़े।***

जेव्हा आपल्या अंतर्यात शब्द प्रगट होतो तेव्हा गुरू सांगतात, बाळा! ह्या दिशेने जा व हा आवाज पकड. आपण विचार करून पहा! यामार्गात कोणाचा विरोध नाही वा कोणाची निंदा नाही. परंतु काय आपण नाम कमाई करीत अंतर्यात जातो का? नाहीतर असे होईल:

***अवरे को उपदेश दे, मुख में पड़हे रेत।***
***रास बिरानी राख ते, खाया घर का खेत।।***

जे लोकांना उपदेश करतात की, तुम्ही कमाई करा, परंतु स्वत: कमाई करीत नाहीत, हे म्हणजे ह्याप्रमाणे आहे की स्वत:च्या शेतात आग लागलेली आहे, परंतु दुसऱ्यांच्या शेताची राखण करतात. सर्वप्रथम आपण स्वत: कमाई केली पाहिजे, तेव्हाच आपण दुसऱ्याची आग विझवू शकतो.

मनास शांत करा, शांत मनच ध्यान–अभ्यास करू शकते. ध्यान–अभ्यासास ओझे समजू नका, प्रेमाने ध्यान–अभ्यास करा. बाहेरच्या कोणत्याही आवाजाकडे लक्ष देऊ नका. मनास बाह्यजगात भटकू देऊ नका, आपले ध्यान तिसऱ्या तिळावर केंद्रित करा.

***

# जगीर कौर

परम संत अजायब सिंहजी महाराजांनी वर्णिलेली एक हृदयस्पर्शी
व अविस्मरणिय घटना, संतबानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान

जगीर कौर नामक महिला माझे भोजन तयार करीत असे. ती खूप चांगली मुलगी होती. तिला परमपिता कृपालजींचे भोजन तयार करण्याची देखील संधी लाभली होती. परमपिता कृपाल अत्यंत दयाळू होते. एके दिवशी जेव्हा परमपिता कृपालजी माझ्या घरी आले, तेव्हा चोहोबाजूंनी दयेचा तरंग पसरला, जगीर कौरचा आनंद गगनात मावेनासा झाला, तिने भोजन तयार केले. हुजूर कृपालजींनी आवळ्याचे लोणचे देखील खाल्ले. जगीर कौरचे डोळे हुजूर कृपालजींच्या दर्शनात तल्लीन झाले होते. तिला तो प्रसंग आठवला जेव्हा ती पहिल्यांदा परमपिता कृपालजींना भेटली होती.

हुजूर कृपालजी पाच-सहा तास व्यतीत करून परत गेल्यावर जगीर कौरला इतके रडू आले की ती सर्वांनी सांत्वन करूनही शांत झाली नाही. शेवटी ती रडत-रडतच झोपली. परमपिता कृपालजींना परत जाऊन जवळ-जवळ बारा-तेरा तास झाले होते. तरी जगीर कौर खूप उदास होती. शेवटी हुजूर कृपालजी महाराज दिल्लीतून शब्द-रुपात उड्डाण करुन जगीर कौर कडे आले व म्हणाले,''मुली, तू का रडतेस? तू माझी आठवण काढलीस व मी आलो आहे. आता रडण्याची काय गरज?'' जगीर कौरने महाराज कृपालजींच्या पायावर मस्तक ठेवले व शांत झाली. हुजूर कृपालजी म्हणाले, ''मुली, तुला जर बागेत सहल करायची असेल तर माझ्या सोबत चल.''

हुजूर कृपालजी उडू लागले व त्यांच्या पाठोपाठ जगीर कौर देखील उडू लागली. हुजूर खूप उंच आकाशापेक्षा वर निघून गेले, तेथे सुंदर हिरव्यागार बागा लावलेल्या होत्या, त्या बागेतील वृक्षांच्या फांद्या चांदीच्या होत्या आणि फांदीवरील पाने सोनेरी होती. त्या वृक्षांवर अद्‌भुत प्रकारची फळे लागलेली

होती, त्यांचा रंग देखील सोनेरी होता. ती सोनेरी आणि चंदेरी रंगांची फळे अद्‌भुत होती. या देशात त्याप्रकारचे सोने-चांदी मिळू शकत नाही व त्या तऱ्हेची फळे देखील सापडू शकत नाहीत. त्या बागांमध्ये अनेक साधू बसून वंदना करीत होते. जेव्हा त्या साधूंच्या भोजनाची वेळ होत असे, तेव्हा बागेत लागलेल्या फळांमधुन अमृताची धार वाहू लागत असे, जी धार त्या साधूंच्या तोंडात जाऊन पडत असे.

जगीर कौरने विचारले की,''हे सतगुरु! या फळांमध्ये अमृत कोठून येते जे संपतच नाही?'' हुजूर कृपालजी महाराज म्हणाले,''मुली, हे अमृत परमेश्वराकडून येते. कोणी कितीही प्यायले तरी ते संपत नाही. जे साधू संसार मंडळात परिपूर्ण संतांच्या हूकूमानुसार ध्यान-अभ्यास करून इथे येतात, याबागेत सहल करतात, त्यांना हे अमृत इथे प्राशन करण्यास मिळते. अमृत पिऊन त्या शिष्यांस संतोष व तृप्ती मिळते.

हे अमृत सर्वांसाठी आहे. इथे कोणत्याही गोष्टीची उणीव नाही. परंतु जे गुरुज्ञाना अभावी मृत्युलोकासच आपला देश समजून बसलेले आहेत, परमेश्वराचे ध्यानच करीत नाहीत आणि रात्रंदिवस विषय-विकारांमध्ये दंग आहेत, त्यांना संसार मंडळातही दु:ख भोगावे लागते, ते मृत्युनंतर भूत-प्रेत बनतात व चौऱ्याऐंशी लक्ष योनींचक्रात जाऊन त्यांची दुर्दशा होते. त्यांच्या वाट्याचे हे अमृत व्यर्थ जाते. ज्यांनी संतांची संगत केलेली असते, त्यांनाच हे अमृत प्राप्त होते, केवळ तेच इथे येऊन सुखप्राप्ती करीत आहेत.

परमात्मा जेव्हा गुरुंद्वारे जीवांवर दया करतो व आपल्यावर श्रद्धा-विश्वास निर्माण होण्याची देणगी देतो, तेव्हाच जीव संत-सतगुरुंच्या दयेने इथे येऊ शकतात. नाहीतर कोणातही इतकी ताकद नाही की या देशात येऊन अमृताचे प्राशन करू शकेल, कारण हे जग काळाच्या नगरीलाच सर्वश्रेष्ठ दैवी देणगी, सुखांची नगरी समजून बसलेले आहे. जगात लोक खूप दु:खी आहेत, ते रडतात, आक्रोश करत असतात.''

जगीर कौरने परमपिता कृपालजींना विचारले,''हे सतगुरू, सच्चे बादशहा, काय मी खरोखरीच संसारात मरेन? मृत्यु कशास म्हणतात?''हुजूर कृपाल हसून म्हणाले,''जर कोणा दुसऱ्या जीवात्म्याने ही गोष्ट विचारली असती तर मी अचंबित झालो असतो. तू समंजस आहेस, तुला संतांचे भोजन करण्याची संधी लाभली आहे. ही खरी गोष्ट आहे की तुझा अंतसमय निकट आलेला आहे, तेव्हा तुला त्याविषयी थोडेफार सांगतो. मी तुला सांगितले तर तुला विश्वास बसणार नाही. तू आपले डोळे बंद कर.

जेव्हा जगीर कौर ने आपले डोळे बंद केले, तेव्हा आपण म्हणालात,''मुली, तू माझ्या सोबत चल आणि सुंदर-सुंदर देशांची सहल कर.'' पुढे हुजूर कृपालजी उडत चालले होते व मागे-मागे जगीर कौर उडत चालली होती. आकाशात जाऊन हुजूर अदृष्य झाले. जगीर कौर एकटीच उडत चालली होती. रस्त्यात एक मोठा समुद्र आला, तेव्हा जगीर कौरने विचार केला, जर मी या समुद्रात पडले तर मी कशी वाचेन? जगीर कौर असा विचार करीतच होती तितक्यात काळाचा यमदूत छत्री घेऊन आला व म्हणू लागला,''माझ्या सोबत चल, मी तुला नेण्यासाठी आलेलो आहे.'' जगीर कौर म्हणाली,''मी तुझ्या सोबत जाऊ इच्छित नाही, तू तर यमदूत आहेस. मी तर माझ्या सतगुरू कृपालजीं सोबत जाणार आहे. माझे सतगुरू अत्यंत सुंदर आहेत व त्यांचे डोळे सिंहासारखे आहेत. त्यांचे रोम-रोम चमकतात.'' जेव्हा जगीर कौरने सतगुरुंचे वर्णन केले तेव्हा यमदूत तिथून पळून गेला.

उडता-उडता जगीर कौरने पाहिले की एका बाजूला जंगल व ओसाड जमीन आहे, तर दुसऱ्या बाजूला बाग-बगिचे आणि तेजोमय प्रकाश आहे. जगीर कौर विचार करू लागली की, इथून कोणत्या दिशेला जाऊ, कोणताही रस्ता दिसत नाही? तिने सतगुरुंपुढे विनंती केली की सच्चे बादशहा, दर्शन द्या. हुजूर कृपालजी उंच जागेतून उडत-उडत आले. पुढे तेजोमय प्रकाश पसरत चालला होता. जेव्हा हुजूर कृपालजी जवळ आले तेव्हा जगीर कौरने

अत्यंत प्रेमाने आपल्या चरणांवर मस्तक ठेवून नतमस्तक झाली. सतगुरूंनी प्रेमाचा वर्षाव करीत म्हटले,''मुली, चल जाऊया.'' पुढे-पुढे हुजूर कृपालजी चालले होते व मागे-मागे जगीर कौर चालली होती. खूप उंच जागी जाऊन सतगुरु म्हणाले,''मुली, हा आपला देश आहे. इथे संत रहातात.'' जगीर कौर म्हणू लागली,''मला इथेच राहू द्या. अशा प्रकारचा अजब देश पुन्हा कुठे मिळेल?'' सतगुरु म्हणाले,''मुली, आता इथे रहायचे नाही. इथे तर तुला केवळ सहल करविण्यासाठी आणलेले आहे. अजुन तुझा काही वेळ बाकी आहे.'' जेव्हा फिरत-फिरत पुढे गेले, तेव्हा तेथे एक फार सुंदर महाल होता. कळत नव्हते की तो महाल कोणत्या साहित्यापासून बनलेला होता व त्यात हा प्रकाश कोठून येत होता? त्या महालात जाऊन पाहिले तर तेथे एक खूप उंच व सुंदर सिंहासन सजवून ठेवलेले होते. त्या सिंहासनावर बाबा सावन सिंहजी बसलेले होते. त्यांच्या बरोबरीने महाराज कृपाल बसलेले होते. तेथे इतरही अनेक संत समाधी लावून बसलेले होते.

तिथून हुजूर कृपाल व जगीर कौर आले. रस्त्यात एके जागी हाय-हाय असा कोलाहल ऐकू आला. एका बाजूस अग्नीवर्षाव होत होता, जो तिथल्या लोकांना भाजत होता. जगीर कौरने विचारले,''हुजूर हा काय प्रकार आहे?'' तेव्हा सतगुरू म्हणाले,''मुली, हे नरक आहे. ज्यांनी लोकांची फसवणूक केली, त्यांना लूटले-लुबाडले, अन्याय केला, गोरगरीबांना छळले, त्यालोकांवर हा अग्नीवर्षाव होत आहे. ज्यांनी न्याय केला नाही, जे संतांशी वैर करीत राहिले व कोणतेही सत्कर्म केले नाही, ते आजपर्यंत नरकात सडत राहिलेले आहेत. आज कोणीही त्यांची विनंती ऐकत नाही, ते सदैव दु:खीच रहातात. तू ध्यान-अभ्यास कर, ध्यान-अभ्यासाच्या प्रतापामुळे यमदूत जवळ येत नाहीत. तू जेव्हाही माझे स्मरण करशील तेव्हा मी तुझ्या मदतीसाठी जरुर येईन.'' गुरु सर्वप्रकारे आपल्या शिष्याचा सांभाळ करतात.

***

# कलियुगातील जीव

सत्संग : परम संत अजायब सिंहजी महाराज, गुरु नानक देवजींची वाणी,
सन्त बानी आश्रम, १६ पी एस, राजस्थान – ४ फेब्रुवारी १९९५

परमपिता परमात्मा सावन–कृपालजींच्या चरणी नमस्कार असो, ज्यांनी कृपा करून आपणांस त्यांच्या आठवणीत बसून त्यांचे गुणगान करण्याची संधी दिली आहे. सर्वजण परमात्म्याकडे काही ना काही मागतात. असा कुठला जीव आहे जो हे म्हणतो की मला नाम नको? प्रत्येक समाज, मंदिर वा मशिदींत प्रभुच्या नामाची चर्चा होत असते, सर्वांनाच परमात्म्यास प्राप्त करण्याची इच्छा आहे, परंतु परमात्म्याने नामरुपी वस्तू कोणास द्यावयाची, हे स्वत:च्या अखत्यारीमध्ये ठेवलेले आहे. ज्या आत्म्यास परमात्मा नाम देऊ इच्छितो, त्या आत्म्यास तो सतगुरू चरणी पाठवितो, मग आत्म्याची जन्मजन्मांतराची परमात्माप्राप्तीची तहान भागते. गुरु नानकदेवजी सांगतात:

***दे दे आखे सबको जे भावे ते दे। गुरु द्वारे देवसी तिखा न वारे से।।***

जेव्हा एखादा आत्मा परमात्म्याच्या निवडीत येतो,परमात्मा त्या आत्म्याची जन्म–मरणाच्या फेऱ्यातून सुटका करण्याचा निर्णय घेतो, तेव्हा त्या आत्म्यावर तो कृपादृष्टी करतो. त्याच आत्म्याची पूर्ण सतगुरुंशी गाठ पडते. त्याआत्म्याच्या अंतरातील जन्म–जन्मांतराची असलेली परमात्माप्राप्तीची तहान भागते.

आपला शरीररुपी मातीचा पुतळा नामाच्या मदतीनेच चालतो, बोलतो, उठतो, बसतो, सर्वत्र धावपळ करीत असतो. जसे माशाच्या चारीही बाजूस पाणीच पाणी असते, परंतु तरीही मासा तहानलेला असतो. जोपर्यंत मासा पाण्यात पलटी खात नाही, तोपर्यंत तो पाणी पिऊ शकत नाही. आपण जेव्हा पूर्ण सतगुरुंच्या संगतीत जातो, त्यांनी परमात्मा प्राप्तीसाठी सांगितलेल्या युक्तीवर अंमलबजावणी करतो, आपले विचार या संसाराच्या दिशेने पलटून नामाशी जोडतो, तेव्हाच आपण आपल्या आत्म्याची तहान भागवू शकतो.

जेव्हा गुरु नानकदेवजी महाराज सिद्धांकडे गेले, तेव्हा त्या सिद्धांनी आपणांस अनेक प्रश्न विचारले. त्यांनी विचारले,''महाराजजी! आपण आम्हांस सांगा की **कलियुगात जिवांची** कोण-कोणती लक्षणे असतील? **कलियुगामध्ये जीव** कोणकोणत्या प्रकारची साधने करतील?'' त्यांना गुरु नानकदेवजींनी अत्यंत प्रेमाने समजावून सांगितले,''जास्तकरून **कलियुगामध्ये जीव** पांखडी असतील. मुक्ती नामामध्ये आहे व नाम संतांद्वारेच आपणांस प्राप्त होऊ शकते. परमात्मा सच्चा आहे व त्याचे नामदेखील सच्चे आहे. हे परमात्मा! तू धन्य आहेस, तू आम्हांस अनमोल नामाशी जोडले आहेस.''

महाराज कृपालजी सांगत असत,''सत्याचे बीज कधीच नाहीसे होऊ शकत नाही. परंतु सत्याचा अनुभव घेण्यासाठी विवेक-बुद्धीची आवश्यकता असते.'' सत्य व असत्याचा अचुक निर्णय घेऊ शकणाऱ्या बुद्धीस विवेकबुद्धी म्हणतात. ज्याप्रमाणे राजहंसाच्या चोचीत एक विशेष गुण असतो की तो त्याच्या चोचीद्वारे पाणी-मिश्रित दूधापासून पाणी निराळे करून तो केवळ दूध प्राशन करतो व पाणी पीत नाही, त्याप्रमाणे आपण जेव्हा आपल्या विचारांना पवित्र करीत संसारातील वाईट गोष्टींपासून निराळे करतो, आपल्या अंतरात शील, क्षमा, संतोष आणि वैराग्य यांची निर्मिती करीत, नामाची कमाई करीत, आपल्या आत्म्यास अंतर्यामध्ये नेतो आणि या जगापासून पलटतो, तेव्हा आपणांस देखील विवेकबुद्धी प्राप्त होते. तेव्हा आपणांस उलघडा होतो की सत्य (सच्चे सतगुरु) कुठे आहे. सत्य कधीही स्वत:हून बोलत नाही, परंतु आपण जेव्हा त्याच्या समीप जातो, तेव्हा ते आपल्यापासून काही लपवून देखील ठेवीत नाही. आपल्यासमोर गुरु नानकदेवजींची वाणी सादर केली जात आहे. ती आपण लक्षपूर्वक ऐकली पाहिजे.

**सती पापु करि सतु कमाहि। गुर दीखिआ घरी देवण जाहि।**

गुरू नानकदेवजी महाराज सांगतात,''**कलियुगात जीव** स्वत:स स्वामी, गुरु तसेच धर्मसंचालकदेखील म्हणवून घेतील. धर्माचा प्रसार करीत असूनही

ते पापांपासून दूर हटणार नाहीत. पाप करताना पुढे-मागे पाहणार नाहीत.'' आपणांस कल्पना आहे की संत-महात्म्यांनी स्वत:च्या दहा बोटांच्या मदतीने, मेहनत करीत स्वकमाई करण्यावर खूप जोर दिलेला आहे. जोपर्यंत आपण स्वमेहनतीने कमाई करून आपला उदरनिर्वाह करीत नाही, तोपर्यंत आपले विचार पवित्र होतील अशी कल्पना देखील हृदयातून काढून टाका.

***जैसा खाए अन्न वैसा होय मन।***

आपण खात असलेल्या अन्नाचा, आपल्या मनावर खूप परिणाम होत असतो. आपण जर पूजेत मिळालेल्या किंवा सेवकांनी दान केलेल्या धनाचा वापर करीत आपला उदरनिर्वाह करू लागलो, तर आपली काय अवस्था होईल? कारण काहीतरी अपेक्षा ठेवल्याशिवाय कोणीही दान करीत नाही. जर कोणी आजार बरा व्हावा म्हणून दान करीत असेल तर त्या दानरूपी धनाचा उदरनिर्वाहासाठी वापर करणाऱ्या व्यक्तीसच ते आजारपण घ्यावे लागले ना? मी पाहिले आहे की अनेक वृद्ध स्त्रिया भाकरीचे दान करण्यापूर्वी ती भाकरी त्यांच्या आजारी मुलांच्या डोक्यावरून ओवाळून मगच दान करतात. तुम्ही शांत चित्ताने विचार करा! जो कोणी ती भाकरी खाईल त्याचे विचार कसे बरे निर्मळ असतील? गुरु नानकदेवजी सांगत आहेत की, कलियुगातील जीव असे पाखंडी असतील की ते स्वत:स धर्मात्मादेखील म्हणवून घेतील व पापही करतील.

मी नेहमी सांगतो की, काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार यांची स्थुल गाठ, आपल्या दोन्ही नेत्रांमागील बाजूस, सूक्ष्म त्रिकुटीत आहे. आपण जोपर्यंत शब्दनामाची कमाई करून पारब्रह्मामध्ये पोहचत नाही, तोपर्यंत जर कोणी म्हणू लागला की मी बाह्यजगात उत्तम वक्ता बनल्याने या पाच डाकूंपासून माझा बचाव होईल, तर तो स्वत:ची फसवणूक करीत आहेच व सोबत जगासदेखील फसवीत आहे. केवळ वक्तव्याने आपण गड सर करू शकत नाही. असा मनुष्य बाह्यस्वरूपाने महात्म्याचे रूप धारण करून जगास

दाखवितो, परंतु अंतर्यात बसलेला परमात्मा सर्वकाही जाणतो. त्यास इतर कोणाच्याही साक्षीची गरज नसते.

***राम झरोखे बैठके सबका झारा ले, जांकी जैसी चाकरी तांको तैसा दे।***

गुरु नानकदेवजी महाराज सांगतात,''कलियुगात चेले घरातच बसून राहतील, तर त्यांचे गुरू त्यांच्या घरी जाऊन कानामध्ये मंत्र सांगतील.'

***गुरु जिन्हां का अंधला, सिक्ख भी अंधे कर्म करेंण।***
***ओह भाणे चलण आपणे, नित झूठो झूठ बुलेण ।।***

महात्मा चरणदासजी सांगतात,''असे गुरु गल्लोगल्ली फिरत माझ्याकडून दीक्षा घ्या, असे सांगत आहेत.''

***गलियारे गुरू फिरत है कंठी हमरी लो।***

त्यांच्या मनास जसे वाटेल तसे ते वागत असतात. जगास आपल्या मोठेपणाचा दिखावा करून माया जमा करण्याची ते सतत धडपड करीत असतात. त्यांना माया नाचवित असते. भाई गुरुदासजी सांगतात:

***सिक्ख बैठण घरा अंदर, गुरु चल तनाड़े घर जाई।***
***चेले साज वजाएंदे, नचण गुरु बहो विध भाई ।।***

## इसतरी पुरखै खटिऐ भाउ। भावै आवउ भावै जाउ।।

आपण सांगता,कलियुगात पती-पत्नीचे प्रेमदेखील नि:स्वार्थ प्रेम नसते. पती धन कमावून आणतो म्हणूनच पत्नी त्याच्यावर प्रेम करते. तो जर धन कमावीत नसल्यास, पत्नी म्हणते,''मला या निरोद्योगी नवऱ्याचा काय उपयोग? तो परदेशी राहिला काय, वा घरी राहिला काय, एकूण एकच!''

## सासतु बेदु न मानै कोई। आपो आपै पूजा होई।

धर्मग्रंथांमध्ये शास्त्रमर्यादा लिहिलेली आहे की नामाशिवाय मुक्ती मिळू शकत नाही, सतगुरुंशिवाय नाम प्राप्त होऊ शकत नाही व सत्संगाशिवाय आपण हे समजू शकत नाही. परंतु **कलियुगात** हा भावार्थ कोणाच्या लक्षात येणार नाही. **कलियुगात जीव** यावर विश्वास ठेवणार तर नाहीच, ते स्वत:चीच पूजा करवून घेतील. नाम-अभ्यासाची कमाई करणाऱ्या महात्म्यांची खिल्ली

उडवली जाईल. अशा महात्म्यांकडे जाऊ नये असे सांगत, हे लोक स्वत:ची पूजा करवून घेतील. आपण **कलियुगी जीव** देखील, अशा लोकांची पूजा अतिशय प्रेमभावाने करीत असतो. वेदशास्त्रांत लिहिलेले आहे की, जगात असा एकही ग्रंथ नाही की ज्यामध्ये नामाचा महिमा, पूर्ण संतांचा महिमा वर्णिलेला नाही. जर नामाशिवाय मुक्ती नाही, तर मग काय आपण या वेदशास्त्रांच्या शिकवणींनुसार चालतो? कबीर साहेब सांगतात:

***वेद-कतेब कहो मत झूठे, झूठा जो न विचारे।।***

मी गेल्या वर्षी जून महिन्यामध्ये पॅरिसला गेलो तेव्हा तेथील काही अधिकारी मंडळी मला भेटावयास आली. ते म्हणाले हिंदूस्थानातून अनेक धर्मगुरु येथे येतात. ते हिंदूस्थानी धर्मग्रंथांचा संदर्भ देत भाषणे करतात आणि येथून धनसंपत्ती गोळा करून घेऊन जातात. त्यांचे बोलणे ऐकून मी हसू लागलो. मी त्यांना म्हणालो की, हिंदूस्थानातील कोणत्याही धर्मग्रंथांमध्ये, मग तो धर्मग्रंथ हिंदूंचा असो वा मुसलमानांचा असो वा शिखांचा असो, तुम्ही धन द्यावे असे लिहिलेले नाही. जर कुणी अशा रितीने धन गोळा करून घेऊन जात असेल, तर तुम्ही त्यास अटक करावी. मी देखील असे कोणी करू नये असा विडा उचललेला असून, तुम्ही मला त्यासाठी मदत करा. मी देखील तुमच्या सोबत आहे.

संत आपणांस कृतघ्न बनवित नाहीत. ते असे कधीच सांगत नाहीत की परमात्म्याने तुम्हांस सर्वकाही दिलेले असूनही तुम्ही इतरांप्रती कृतघ्न व्हावे, इतर कुणास मदत करू नये. दानावर अधिकार केवळ गरजवंतांचा असतो. महाराज सावन सिंहजी सांगत असत,''सर्वप्रथम तुम्ही स्वत:च्या घरातील गरजांची पूर्ती करावी. घरातील सर्व गरजा पूर्ण झाल्या असतील तर तुमच्या शेजाऱ्यांना मदत करावी.'' कबीर साहेब सांगतात:

***गुरु बिन माला फेरते, गुरु बिन देते दान।***
***गुरु बिन दान हराम है, पूछो वेद पुरान।।***

खरेतर सतगुरुंनाच कल्पना असते की खरा गरजवंत कोण आहे? त्याची आपणा जीवांना कशी माहिती असणार? आपण तर अशा ठिकाणी दान देतो, जेथे अगोदर पासूनच दानाची कमतरता नसते. तेथे दान देण्याची आपणांस संधीच मिळत नाही. हे लोक स्वत:ची पूजा करवून घेतील, मात्र तुम्ही परमात्म्याची पूजा करावी असे कोणीही सांगणार नाही.

**काजी होई कै बहै निआइ। फेरे तसबी करे खुदाइ।**
**वढी लैकै हकु गवाए। जेको पुछै ता पड़ि सुणाए ।।**

**कलियुगात** याजगातील अधिकारी मंडळींबद्दल सांगत आहेत की काजी, न्यायाधीश व इतर मोठे अधिकारी माळा फिरवीत जप करतात, न्यायासनावर देखील बसतात, परंतु लाच घेण्यामध्ये त्यांना काहीच वावगे वाटत नाही. लाच घेणे चांगले आहे की वाईट, त्यावर आपला काही अधिकार आहे का? याचा ते विचारच करीत नाहीत. शास्त्रपुराणात एक गोष्ट आहे. एकदा एका तेलीच्या बैलाने काजीच्या बैलास मारले. तेलीने काजीकडे जाऊन सल्ला विचारला की जर एखाद्याच्या बैलास दुसऱ्या एखाद्याच्या बैलाने मारले, तर त्यास काय दंड होतो? काजी म्हणाला, कोणत्याही कायद्याच्या पुस्तकात त्याबाबतीत कायदा नमुद केलेला नाही. तो तर प्राणी आहे. एखाद्या प्राण्याने दुसऱ्या प्राण्यास मारले तर आपण काय करू शकतो? मग तेलीने काजीस सांगितले की, माझ्या बैलाने तुमच्या बैलास मारले आहे. तेथेच बसलेल्या मुलास काजी म्हणाला की, लाल रंगाचे पुस्तक मला दे, त्यामध्ये कायदा काय सांगतो हे मला पाहू दे. त्या पुस्तकामध्ये बैलासंदर्भात कोणताही कायदा लिहिलेला नसतानाही काजीने दोन-चार पाने चाळली व म्हणाला:

***लाल किताब का है यह फरमान, तेली ने बैल मरवाया ही क्यों।***
***खल खाए करे मशटण्ड, बैल का बैल ते तीस रुपये दंड। जे कोई पूछे ते पढ़ सुनाए ।।***

काजी म्हणाला,''लाल पुस्तक असे सांगते की तेलीने बैलाची हत्या का करविली? तेलीने त्याच्या बैलास गरजेपेक्षा अधिक चारा दिल्याने

बैलास माज आला व दुसऱ्या बैलास ठार केले. त्यामुळे तेलीने बैलाच्या बदल्यामध्ये एक बैल देऊन वर तीस रुपये दंड म्हणून द्यावेत.''

**तुरक मंत्रु कनि रिदै समाहि। लोक मुहावहि चाड़ी खाहि।**
**चउका दे कै सुचा होई। ऐसा हिंदू वेखहु कोइ ।**

आता आपण प्रेमाने सांगत आहात,''हिंदू मंडळी आयुष्यभर याच सुच्चमात (धार्मिक गोष्टींमध्ये) तल्लीन रहातात की पवित्र शेणाचे सारवण केले, भाकऱ्या बनविल्या. बस! यापुढे ते परमात्म्याचे स्मरण करीत नाहीत.'' एकदा गुरु नानकदेवजी महाराज वाटेने जात होते. त्यावेळी गाईंवर देखील कर लादलेला होता. तेथे कर वसूल करण्यासाठी एका ब्राह्मण कर्मचाऱ्याची नेमणूक झालेली होती. तेथून एक गरीब मनुष्य त्याची गाय नेत असताना ब्राह्मण कर्मचाऱ्याने त्या मनुष्यास अडवून गाईचा कर तुला भरावा लागेल असे त्यास सांगितले. त्यावर तो गरीब मनुष्य गयावया करू लागला. या दरम्यान गाईने तेथे शेण टाकले. त्या ब्राह्मण कर्मचाऱ्याने तत्काळ ते शेण उचलले कारण गाईचे शेण पवित्र मानले जाते की ते शेण सारवण करण्यास वापरता येईल. गुरु नानक देवजी महाराजांनी 'आसाची की वार' या ग्रंथात सांगितले आहे:

***गऊ ब्राह्मण को कर लावे गोबर तरन न जाई।***

हे पाहून तो गरीब माणूस त्या ब्राह्मणास म्हणाला,''मी स्वत: ब्राह्मण आहे. माझ्याकडे असलेल्या गाईवर तू कर मागत आहेस, त्या गाईच्या शेणाने तू कसा बरे तरला जाशील?'' गुरु नानकदेवजी महाराज सांगतात, ''पावित्र्य नामात आहे. परंतु तुम्हांस नामाचा विसर पडला असून, केवळ बाह्यजगातील पावित्रता पाळण्याच्या मागेच तुम्ही लागलेला आहात. तुम्ही स्वत:स हिंदू म्हणविता. तुम्ही हिंदू तर बनला नाहीतच, परंतु हिंदू असण्याचा अहंकार मात्र तुम्हांच नक्की झाला.''

**जोगी गिरही जरा बिभूत । आगै पाछै रोवहि पूत।**

गुरु नानकदेवजी महाराज आणि इतर दहा गुरुंच्या काळामध्ये योगी लोकांचा भरपूर प्रभाव होता. ते योगी खूप योगाभ्यास करीत असत. जे कोणी आपले घरदार त्यागून योगी बनत, ते कानांमध्ये कुंडले धारण करीत, ते इतर लोकांमध्ये सामिल होत नसत. त्यांनी त्यांच्या केसांचे रूपांतर जटांमध्ये केलेले असे. प्रत्येक सामान्य मनुष्य दुरून त्या योगींना नमस्कार करीत, कारण त्यांचा समज असे ज्या योगींनी इतक्या मोठ-मोठ्या जटा धारण केल्या आहेत, कानात छिद्रे पाडण्याची तीव्र वेदना सहन करीत कुंडले परिधान केली आहेत, तेव्हा नक्कीच त्यांनी परमात्म्यास प्राप्त केले असावे.

परंतु परिस्थिती काय आहे? तर मी स्वत: अशा मोठ मोठ्या जटा व कुंडले परिधान केलेल्या योगींना विवाह करताना पाहिले आहे. त्यामुळे जेव्हा सिद्धांनी गुरु नानकदेवजींना **कलीयुगाबद्दल** विचारले असता, गुरु नानक देवजी महाराज सर्वांविषयी सत्य विदित करताना सांगत आहेत की ज्याप्रमाणे एखाद्या गृहस्थी मनुष्याच्या पुढे-मागे त्यांची मुले-बाळे गडबड-गोंधळ, करीत फिरतात, त्याप्रमाणे योगींच्या मागे देखील त्यांची मुले गोंधळ घालीत फिरतात. त्यामुळे योगी आणि गृहस्थी यांमध्ये काय फरक उरला?

मी या अगोदर राहत असलेल्या गावातील एक मनुष्य साधू बनला. तो वीस वर्षे नाथपंथीय बनून राहिला. परंतु सरतेशेवटी मनाने त्यास भ्रमविले व विवाह करण्याचा विचार त्याच्या मनात आला. त्याने सकाळी गावात येऊन पायाखाली पुस्तके ठेवून उंच जागी उभा राहून म्हणाला,''आज दुपारी बारा वाजता प्रलय येणार आहे.'' सर्वजण गृहस्थी असल्याने घाबरून हात जोडून त्यास म्हणू लागले,''बाबाजी! आमच्यावर आपण कृपादृष्टी करावी.'' गावातील एका मनुष्यास याची कल्पना होती की हा बाबा त्यांचे रंग-रंगोटी असलेले स्वरूप बदलून आज दुपारी बारा वाजता गृहस्थी बनणार आहे. त्यामुळे तो मनुष्य लोकांना म्हणाला की, सर्वांनी आपआपल्या घरी जावे, प्रलय वगैरे काही येणार नाही. बारा वाजता हा बैल बनणार आहे, हे ऐकून बाबा त्या

मनुष्यास म्हणाला की,''थांबा, तुला मी शापच देतो.'' परंतु बारा वाजता बाबा स्वत:च्या घरी जाऊन म्हणू लागला, आपल्या धनसंपत्तीची वाटणी करा, मला विवाह करावयाचा आहे. आता तुम्हीच विचार करा, संसारीक मनुष्य आणि त्या बाबामध्ये काय फरक राहिला? कबीर साहेब सांगतात:

***जे गृह करे ते धर्म कर नहीं तो कर वैराग।***
***वैरागी होय बंधन पड़े तांके बड़ो अभाग।।***

आपण जर गृहस्थी असाल तर स्वमेहनतीच्या कमाईमधून दहावा भाग दान–धर्मासाठी बाजूला ठेवावा. परंतु वैराग्य धारण करून साधू बनल्यानंतर जर गृहस्थींपेक्षा नीच पातळीवर जाणे हे अतिशय वाईट कर्म आहे.

**जोगु न पाइआ जुगति गवाई। कितु कारणि सिरि छाई पाई।**

अशास्थितीत तो ना गृहस्थी राहिला ना साधू बनू शकला. सतगुरुंनी परमात्मा प्राप्तीसाठी जी युक्ती सांगितलेली होती त्यानुसार साधना केली नाही, डोक्यावर फक्त भस्मलेपन केले, जे नंतर त्यागून टाकले. त्यापेक्षा स्वत:च्या घरी राहून स्वमेहनतीने कमाई करण्याचे त्याच्या हिताचे होते.

**नानक कलि का एहु परवाणु। आपे आखणु आपे जाणु।।**

गुरू नानकसाहेब सांगतात, कलियुगाचे हे लक्षण आहे की लोकं स्वत:स माहित असूनही दुसऱ्यास त्रास देण्याच्या व त्यांना हीन लेखण्याच्या हेतूने प्रश्न विचारतील व त्यांनी उत्तर दिल्यानंतर म्हणतील, हे तर मी जाणतो.

**हिन्दू कै घरि हिंदू आवै। सूतु जनेऊ पड़ि गलि पावै।**
**सूतु पाइ करे बुरिआई। नाता धोता थाइ न पाई ।**

आता गुरु नानकदेवजी सांगतात,''हिंदू लोक हिंदूंच्या घरी जातात. ते त्यांच्या गळ्यात जानवे घालतात. जानव्याचे खूप मोठे महात्म्य आहे. जानवे परिधान करण्याचा अर्थ असा असतो की परिधानकर्त्याने पवित्रता राखावी, पापकर्मे टाळावीत व प्रण करावा की आता मी या धाग्याच्या बंधनात आहे.

जानव्याचे बंधन म्हणजे धर्माचे बंधन आहे. त्याने जर एखाद्याकडे वाईट नजरेने पाहिले किंवा पापकर्म केले, तर तो स्वत:स ब्राह्मण व हिंदू म्हणवून घेण्याचा हक्कदार असू शकतो काय? महात्मा चरणदासजी सांगतात:

***ब्राह्मण सो जो ब्रह्म पहचाने, बाहर जांदा भीतर आने।***
***काम, क्रोध, लोभ, मोह न होई चरनदास कहे ब्राह्मण सोई।।***

जो ब्रह्मस्थानात पोहचला, ज्याने आपल्या मनास बाह्य जगातून दूर करून अंतर्यात शब्दाशी जोडले, ज्याच्या अंतरात कसलीही कामना नाही, जो सर्व प्रकारच्या वाईट कर्मांपासून अलिप्त आहे, रजोगुण, तमोगुणांच्या पलिकडे गलेला आहे, तोच खरा ब्राह्मण आहे. एक ब्राह्मण जेव्हा गुरू नानक देवजींकडे त्यांच्या गळ्यात जानवे घालण्यासाठी आला असता, ते त्यास म्हणाले, आपण जर पूर्ण ब्राह्मण असाल व हे सर्व सद्‌गुण तुमच्या अंतरात असतील, तर मी तुमचे चरणस्पर्श करण्यास तयार आहे. महात्मा कोणाचीही निंदा करीत नाहीत, ते सत्य सांगतात. गुरू नानकदेवजी सांगतात:

***चौंकड मुल्ल अड़ाया बैह चौंके पाया। सिक्खा कन्न चढ़ाईयां, गुरु ब्राह्मण थीआ।***
***ओह मुआं ओह छड़ पया, बेतगा गया।***

मुली सूत काततात. त्या सूतांचे वेटोळे बनवून ब्राह्मण जानवे बनवितात. जानवे जुने झाल्यानंतर ते काढून नवीन जानवे परिधान करतात. मृत्युनंतर जानवे शरीरासोबतच जळून जाते. आपले शरीर जर आत्म्यासोबत कायम राहणार नसेल तर त्यावर असलेली चिन्हे आत्म्यासोबत कशी जातील?

***दया कपाह संतोख सूत जत गंडी सद वट। ऐह जनेऊ जीअ का है ही तां पांडे घत।***
***न एह टूटे न मल लगे न ये जले न जाए। धन सो मानस नानका जो गल चले पाए।।***

आपण जेव्हा आपल्या शरीराची नऊ द्वारे रिक्त करीत, आपल्या आत्म्याची मनाच्या पंजातून सुटका करतो, तेव्हा आपल्या अंतर्यात दया प्रगट होते. आपण प्रथम स्वत:वर दया करतो. जेव्हा आपल्यावर दया होते, त्यानंतरच आपण इतरांवर दया करू शकतो.

आपल्या अंतरातून कामना जाऊन तेथे संतोष प्रगट होतो, कल्पना-लोभ तेथून निघून जातात. नामरूपी जानवे ना कधी तुटते, ना कधी मलिन होते. त्यामुळे हे नामरूपी जानवे परिधान करणारे धन्य आहेत.

एकदा कबीर साहेब गंगेच्या काठावर फिरत होते. तेथे काही लोक स्नान करीत असताना एका ब्राह्मणाच्या अंगावर, हरिजनाच्या अंगावरील पाण्याचे शिंतोडे उडाले. त्यामुळे तो ब्राह्मण हरिजनास मारू लागला व म्हणाला की माझ्याकडे एकच धोतर होते. ते पाहून कबीर साहेब ब्राह्मणांस म्हणाले,''हा देखील परमात्म्याचा पुत्रच आहे.'' ब्राह्मणाने त्यांस म्हटले की,''हा तर मलीन जातीचा आहे. माझ्यावर याचा शिंतोडा उडला व माझ्याकडे दुसरे धोतर देखील नाही.'' कबीर साहेबांनी त्यास खूप समजावले की,''आपल्या सर्वांच्या शरीरामध्ये एकाच प्रकारचा घाम व रक्त असते. आपण सर्व एकाच पद्धतीने जन्मास येतो, मृत्युदेखील एकाच पद्धतीने येतो.'' परंतु ब्राह्मणास त्यांचे सांगणे पटले नाही. कबीर साहेब सांगतात:

***जे तू ब्राह्मण ब्राह्मणी जाया तो आन वाट काहे नहीं आया।***
***तुम कत ब्राह्मण हम कत सूत, तुम कत लहू हम कत दूध।।***

आपण सर्वजण एकाच पद्धतीने मातेच्या उदरातून जन्मास येतो, तर तू जन्मण्यासाठी दुसरी एखादी पद्धत का बरे निवडली नाहीस? तुझ्या शरीरामध्ये देखील रक्त आहे व माझ्याही शरीरामध्ये रक्त आहे. तसे असते तर तुझ्या शरीरामध्ये दूध असावयास हवे होते.

सुंदरदास नामक महाराज सावन सिंहजींचा खूप ध्यान-अभ्यास करणारा एक नामधारी होता. या जगातील अनेक प्रकारच्या खूप दु:ख-यातना त्याने भोगल्या परंतु तेवढीच त्याची ध्यानाची साधनादेखील होती. एकदा पंजाबमधील फाजिल्का गावाजवळून तो जात होता. त्यावेळी सुंदरदासने ग्रामप्रमुखपदाचा त्याग केलेला होता. समोरून घट्टावाली गावी राहणारा कोष्टी (विणकर) येत होता,ज्याने पहारेकऱ्याचे काम सोडून दिले होते. दोघेही एकमेकांच्या शेजारून

जात होते. सुंदरदास त्या कोष्टीपेक्षा वयाने जेष्ठ होता. त्याने विचार केला की, कोष्टीने अगोदर अभिवादन केल्यानंतर आपण त्यास उत्तर द्यावे, कारण मोठी माणसे असाच विचार करतात. परंतु तरीही सुंदरदासने त्या कोष्टीस 'सत् श्री अकाल' म्हटले. सर्वसाधारणपणे प्रथम जो अभिवादन करतो, तो ते आपल्या पद्धतीने करतो. कोष्टीने 'साहब सलाम' म्हटले तेव्हा सुंदरदास त्यास म्हणाला,''मी तर तुला सत् श्री अकाल असे म्हटले.'' कैमा कोष्टी म्हणाला की,''सत्श्री अकाल असे नास्तीक लोकं बोलतात.''

सुंदरदासने त्यास विचारले की, आस्तिक व नास्तिकांची लक्षणे कोणती? कैमा कोष्टी म्हणाला, आस्तिक लोकांमध्ये रक्ताऐवजी दूध असते. सुंदरदास म्हणाला आपण आता पाहूयाच की कोणातून दूध बाहेर येते? सुंदरदास सहा फुटी, मजबूत तरुण होता. तो गदगा-लाठी चालविण्यात पारंगत होता. तो कैमा कोष्टीस म्हणाला, जर तू पळू लागलास तर मी तुझ्या घोट्यावर लाठी मारीन व तू समोर आलास तर तुझ्या डोक्यावर लाठीने मारीन. तो कोष्टी उंटावरून खाली उतरला. सुंदरदासने त्याच्या डोक्यावर लाठी मारली. तो तेथेच कोलमडून खाली पडला व म्हणू लागला आणखी मारू नकोस.सुंदरदास त्यास म्हणाला, तू उठून उभा रहा. तो कोष्टी स्वत:स सावरून पळू लागताच सुंदरदासने लाठीने त्याच्या घोट्यावर मारून त्यास खाली पाडले व त्याच्या डोक्यावर लाठीने प्रहार करीत म्हणू लागला, जोपर्यंत तुझ्या शरीरातून दूध बाहेर येत नाही, तोपर्यंत मी तुला सोडणार नाही.

अखेरीस तेथे काही माणसे जमा झाली व त्यांस पोलिसांकडे घेऊन गेली. पोलिसांनी त्यांना विचारले, तुम्हा दोघांमध्ये कशावरून वाद झाला? सुंदरदास म्हणाला,''विशेष काही नाही. केवळ साहब सलाम आणि सत् श्री अकाल यांमध्ये वाद होता. कैमा कोष्टी म्हणत होता की, त्याच्यामध्ये दूध आहे. मी म्हणालो, जर तुझ्या शरीरामधून दूध बाहेर आले, तर मी तुला सोडून देईन.'' अखेरीस फजिल्का येथील न्यायाधिशाने सुंदरदासच्या लाठीवर

लिहिले की, जो कोणी यास अभिवादन करु इच्छितो, त्याने केवळ ‘सत् श्री अकाल’ असेच म्हणत अभिवादन करावे. हे सर्व सांगण्यामागे माझा तुम्हांस हेच समजावण्याचा हेतू आहे की, आपणांस सत्याचे ज्ञान नसते की साहब सलाम हे देखील परमात्म्याचे नाव आहे तसेच सत्श्री अकाल देखील परमात्म्याचेच नाव आहे. त्यास अकाल म्हणा, सलाम म्हणा, राम म्हणा, रहीम म्हणा, ही सर्व परमात्म्याचीच नावे आहेत. दया करणाऱ्यास रहीम म्हटले गेले आहे व खाली पडलेल्यास उठविणाऱ्यास गिरधारी संबोधले गेले आहे. गुरु नानकदेवजी महाराज म्हणतात:

***बलिहार जावां जेते तेरे नाम है।***

आपण प्रेमाने सांगता की, संत–महात्म्यांनी अशी जी चिन्हे दर्शविलेली आहेत त्यांचा परमार्थाशी खूप निकटचा संबंध आहे. जानवे वा शिखांचे हातामधील कडे आपणांस इशारा देते की, हे परिधान केल्याने तू धर्म–बंधनामध्ये बंधिस्त झालेला आहेस.

**मुसलमानु करे वडिआई । विणु गुर पीरै को थाइ न पाई।**
**राहु दसाइ ओथै को जाइ। करणी बाझहु भिसति न पाइ।**

त्याकाळी हिंदु व मुसलमान असे दोनच धर्म होते. मुसलमान त्यांच्या देवाच्या तर हिंदू त्यांच्या देवाच्या मोठेपणाचे गुणगान करतात. प्रियजनहो! सतगुरुंशिवाय नाम प्राप्त होत नाही. आपण परमात्म्यास प्राप्त करू शकत नाही. सतगुरुंशिवाय तुमचे खरे घर, सच्चखंड तुम्हांस सापडणार नाही. केवळ नाम घेणे पुरेसे नाही, ध्यान–अभ्यास करून नामाची कमाई करणेदेखील गरजेचे आहे. परमात्मा प्राप्तीच्या मार्गाची माहिती विचारणारे अनेक जण आहेत, परंतु त्यानुसार मार्गक्रमण करण्यास कोणीही तयार होत नाही.

**जोगी कै घरि जुगति दसाई। तितु कारणि कनि मुंद्रा पाई।**
**मुंद्रा पाइ फिरै संसारि। जिथै किथै सिरजणहारु।**

आपण जगामध्ये एखाद्या समजाचा मोठा दबदबा असलेला पाहतो की यांचा मोठा आश्रम आहे, तेथे खूप लोकांचा जमाव होतो, त्यांच्याकडे प्रचंड धन-सपंत्ती आहे. सर्वसाधारणपणे अशा गोष्टी पाहूनच तेथील शिष्यत्व प्राप्त केले जाते. महाराज सावन सिंहजी अतिशय प्रेमाने सांगत असत की, एक महात्मा वाटेने जात असता, तेथील एक शेतकरी त्यांना म्हणाला,''तो पहा महात्माजी! किती मोठा जनावरांचा कळप येत आहे!'' त्यावर महात्म्याने त्यास विचारले,''त्या कळपामध्ये तुझी किती जनावरे आहेत?'' तो उत्तरला, ''माझे तर त्या कळपात काहीच नाही, परंतु माझ्या काकांचे एक वासरू आहे.'' आपण सांगत असत, तुम्हास केवळ तुमच्या नशिबामध्ये असेल, तेच प्राप्त होणार आहे. सर्व जग जर हिंदू वा शिख झाल्यास, जगामध्ये सर्वत्र शांती पसरणार आहे का? परंतु आपले मन आपणांस ईर्षेमध्ये ढकलून देते.

**जेते जीअ तेते वाटाऊ। चीरी आई ढिल न काऊ।**

गुरु नानकदेवजी सांगत आहेत,''आपण याजगात जन्म घेणारे सर्व जीव एखाद्या वाटसरू किंवा पाहुण्यासमान आहोत. जेव्हा एखाद्याची मृत्युघंटा वाजते, त्यास धर्मराजाचे आमंत्रण-पत्र येते, तेव्हा तो कोणाशीही सल्ला-मसलत करू शकत नाही, कोणास सांगूनही जाऊ शकत नाही. त्यांचा खाली सोडलेला श्वास खाली तर वर घेतलेला श्वास वरच अडकतो.

**एथै जाणै सु जाइ सिआणै। होरु फकड़ु हिंदू मुसलमाणै।**

गुरू नानकदेवजी महाराज अतिशय प्रेमाने या वाणीचा सारांश समजावून सांगत आहेत. सर्वप्रथम आपण सर्व समाजांबद्दल माहिती समजावून सांगितली की, हिंदू लोक त्यांच्या समाजाच्या तर मुसलमान लोक त्यांच्या समाजाच्या मोठेपणाचे गुणगान करतात. परंतु ते या गोष्टीचा विचार करीत नाहीत की ते ज्या शब्दांसाठी आपआपसांमध्ये वाद-विवाद, भांडण-तंटा करीत आहेत, ते शब्द परमात्मारूपी शक्तीचीच नावे आहेत. आपण त्या शक्तीस खुदा, परमात्मा, वाहेगुरु किंवा राम, रहीम काहीही म्हणा.

खडीसाखर कोणत्याही बाजूने खाल्ली तरी तोंड गोडच होते. केवळ खडी–साखर, खडी–साखर असे उच्चारण करून तोंड गोड होत नाही, त्यासाठी खडी–साखर खावी लागेल. वाहे गुरु, खुदा, परमात्मा, राम, रहीम असा केवळ जप करून काही होणार नाही. आपण ज्यांचा उल्लेख करीत आहोत, शब्दनामाची कमाई करून त्यांना जाऊन भेटावे देखील लागेल.

गुरू नानकदेवजी महाराज मक्का येथे गेले असता, काजी रूकमदीनने त्यावेळी त्यांना प्रश्न विचारला,''तुम्ही सांगा की परमात्म्याच्या दरबारामध्ये हिंदू श्रेष्ठ आहेत की मुसलमान श्रेष्ठ आहेत?'' आपण म्हणालात:

***शुभ अमला बाजो दोनो रोई, जाति पाति मत कोई अहंकार करे।***

शुभकर्म केली नाहीत, तर तेथे दोघेही जण रडत राहतील. जे लोक येथेच परमात्म्यास प्राप्त करतात, त्यास ओळखतात, परमात्मादेखील त्यांची ओळख ठेवतो. पुढे जाऊनही त्यांनी परमात्म्यास व परमात्म्याने त्यांना ओळखायचे असते. जे या जगात महात्मा आहेत, मरणोपरांत देखील ते पुढे महात्माच असतात. प्रियजनहो! असा चुकूनही मनामध्ये विचार करू नका की जे लोक याजगात चोर, लबाड, सट्टेबाज व दरोडेखोर आहेत, मरणानंतर ते महात्मा बनतील.

प्रियजनहो! मी उदाहरण देत असतो की, आपण येथून इंग्लंडला जर गाढवे जहाजाद्वारे पाठवली व आशा केली की मार्गामध्ये गाढवांचे रूपांतर हत्तीमध्ये होईल, मग जरी जहाजाच्या कागदपत्रांवर तशी नोंद करून दिली, तरीही तेथे पोहचल्यानंतर ते गाढवच राहतील. तुम्ही कागदपत्रांमध्ये केलेल्या नोंदीचा काहीच उपयोग होणार नाही. हत्ती पाठवायचे असतील तर येथेच हत्ती खरेदी करून पाठवावे लागतील. त्याचप्रमाणे महात्मा बनायचे असेल तर या जगातच महात्मा बनावे लागेल. परमात्म्यास भेटावयाचे असल्यास जिवंतपणीच त्यास भेटावे लागेल. आपल्या मृत्युनंतर आपल्यामागे नातेवाईक क्रियाकर्मे करीत गंगेमध्ये अस्थी विसर्जन करतील व आपण स्वर्गात जाऊ.

असा जर कोणी विचार केला, तर ती त्याची मोठी चूक असेल. मग यापेक्षा स्वस्त सौदा दुसरा कोणता असू शकतो? आयुष्यभर आपण पाप-कुकर्मे करावीत, आपल्या मृत्युनंतर एखादा नातेवाईक मरणोपरांत केली जाणारी अस्थी विसर्जनाची क्रियाकर्मे तर करणारच आहे. नाही! हा आपला चुकीचा समज आहे. महात्मा कोणत्याही क्रियाकर्मांची निंदा करीत नाहीत, परंतु आपल्या अस्थी गंगेमध्ये टाकल्यास आपणांस मुक्ती मिळेल असा विचार कोणी करू नये. आत्म्याने देहत्याग करताच त्यास त्याच्या कर्मांचा हिशोब चुकता करावा लागतो. म्हणून या संदर्भात आपण प्रेमाने समजावता:

***जो कुछ करना अभी करना, अग्गे का ना भरोसा धरना।***

जिवंतपणीच नाम जपावे आणि परमात्म्यास प्राप्त करावे. जिवंतपणी जर परमात्म्याचा व आपला मिलाप झाला नाही तर मरणोत्तर आपली भेट कशी होईल? आपण विचार करतो की, नाम तर घेतले आहेच, तेव्हा अगोदर याजगातील कामे करून घ्यावीत व नंतर सतगुरुंवर प्रेम करावे व त्यांनी सांगितलेली कामे नंतर करावी. परंतु परमात्म्याच्या योजनेत आपले आयुष्य किती आहे हे आपणांस ठाऊक नसते.

***मता करे पश्चिम की ताईं पूरब ही ले जात।***

**सभना का दरि लेखा होइ। करणी बाझहु तरै न कोइ।**

गुरु नानकदेवजी महाराज सांगतात,''प्रत्येकांच्या श्वासा-श्वासाचा हिशोब होणार आहे. करणी (ध्यान-अभ्यास) केल्याशिवाय परमात्म्यास कोणीही प्राप्त करू शकत नाही.''

**सचो सचु वखाणै कोइ। नानक अगै पुछ न होइ।**

जो कोणी सच्च्या परमात्म्यास प्राप्त करतो, त्या सच्च्या परमात्म्याचा तसेच शब्द-रूपी सतगुरुंचा महिमा गातो, त्यास कोणीही सचखंडात जाता येता काही विचारीत नाही.

***गुरुमुख आए जाए निसंग।***

गुरुमुखाचा सचखंडात जाण्याचा मार्ग खुला झालेला असतो. तो त्याच्या मर्जीनुसार जिवंतपणीच कधीही तेथे ये-जा करू शकतो. मृत्युनंतरच ते सचखंडात जातात असे नाही. आपण जर नित्य-नेमाने एखाद्या गोष्टीचा अभ्यास केला तर त्या गोष्टीमध्ये आपण पारंगत होतो. परमात्मा त्यांना जिवंतपणीच मिठी मारतो. भाई गुरुदासजी सांगतात:

***गुरुमुख गाडी राह चलांदा।***

## हरि का मंदरु आखीऐ काइआ कोटु गड़।

आता गुरू नानकदेवजी या संपूर्ण वाणीचा सारांश वर्णन करतात की आपण विनाकारण हिंदू-मुस्लिम, मंदिर-मशीद असे वाद निर्माण करतो. प्रियजनहो! जर प्रत्येक ठिकाणी त्याच परमात्म्याची चर्चा होत असेल तर आपण कोणत्या मंदिरास वाईट म्हणावे व कोणत्या मशीदीस चांगले म्हणावे. सर्वांचाच आदर करावा, हे आपले कर्तव्यदेखील आहे.

***नौं दरवाजे काया कोट गढ़, दसवां गोप्त रखीजे।***
***वज्र किवाड़ न खुल्ली, गुरु शब्द खुलीजे।।***

खरे मंदिर आपले शरीरच आहे. आपले शरीर एखाद्या किल्ल्यासमान असून त्याची नऊ द्वारे या बाह्यजगाच्या दिशेने उघडतात, तर दहावे द्वार परमात्म्याने गुप्त ठेवले आहे. हे दहावे द्वार अंतर्यात परमात्म्याच्या दिशेने उघडते. परमात्मा या द्वारावर वज्राचा दरवाजा लावून स्वत: आत बसलेला आहे. तुम्ही एखाद्या महात्म्याकडे जा व त्याने सांगितलेल्या पद्धतीने नामाची कमाई करून तर पहा की सतगुरु काय करतात? नामाची कमाई करणाऱ्यास यागोष्टीची कल्पना असते. तुम्ही या बाह्यजगातील मंदिर-मशीदीसाठी का भांडणे करता? परमात्म्याने तुम्हांस हे शरीररूपी मंदिर-मशीद मोफत दिले आहेत, त्यात प्रवेश करून तुम्ही खऱ्या परमेश्वराची पूजा करा. परमेश्वर सर्वांना दान देतो, तो सर्वांशी बोलतो देखील. गुरुसाहेब सांगतात:

***ठाकूर हमरा सदबोलंता सर्व जीआं को प्रभ दान देता।***



**अंदरि लाल जवेहरी गुरमुखि हरि नामु पड़ु।**
**हरि का मंदरु सरीरु अति सोहणा हरि हरि नामु दिड़ु।**

गुरु नानकदेवजी सांगतात,''तुम्ही अंतर्यात जाऊन पहा! जे काम, क्रोध, लोभ, मोह आणि अहंकार या पाच डाकूंना बाहेर हाकलतात, त्यांचे शरीर किती सुंदर आहे? तेथे क्षमा, धीर, संतोष, शील व विवेक यांची निर्मिती होते. आत्ताच्या क्षणी आपले शरीर या पाच डाकूंनी लुटलेले आहे, खराब केलेले आहे. मी तुम्हांस कोणत्या बाहेरील दगड-विटांनी तयार झालेल्या मंदिराबद्दल सांगत नसून तुमचे शरीरच हरिमंदिर आहे.'

**मनमुख आपि खुआइअनु माइआ मोह नित कड़ु।**
**सभना साहिब एकु है पूरै भागि पाइआ जाई।।**

आपण प्रेमाने सांगत आहात, 'आपण मनाच्या नादी लागून या शरीररूपी मंदिरामध्ये परमात्मा बसलेला आहे. त्या मंदिरामध्ये आपण प्रवेश करीत

नाही, त्याचा शोध घेत नाही. परंतु आपल्या हाता–पायांच्या मदतीने बनविलेल्या बाह्यजगातील मंदिरात मात्र त्याचा रात्रं–दिवस शोध घेत असतो. आपण घरा–दाराच्या जबाबदाऱ्या त्यागून जंगलात जाऊन लपून बसतो, डोंगर–पर्वतांवर जातो, परंतु परमात्मा तर आपल्या अंतर्यात वसतो.

प्रभु आपल्या सर्वांचा एकच दाता, बादशहा आहे. सर्वांचा परमात्मा एकच असून त्यास भेटण्याचा मार्ग देखील एकच आहे. मग आपण कोणाची घृणा का बरे करावी? आपण सर्वांवरच प्रेम करावयास हवे. मंदिर, मशीद, गुरुद्वारे ही सर्व परमात्म्याची स्थाने आहेत. त्यामुळे आपण या सर्वांचा आदर–मान–सन्मान करावयास हवा. परमात्मा तर आपल्या शरीरामध्ये आहे. म्हणून आपण शरीरामध्ये जाऊन त्याचा शोध घेणे गरजेचे आहे. शरीरास कोणी खरी मशीद, कोणी खरे मंदिर तर कोणी खरा गुरुद्वारा असे संबोधले आहे. म्हणून आपले कर्तव्य आहे की आपण शब्द–नामाची कमाई करून आपले जीवन पवित्र बनवावे.

या वाणीमध्ये गुरु नानकदेवजी महाराज सांगत आहेत की, संपूर्ण जग एखाद्या वाटसरू समान आहे. म्हणून तोच वाटसरू समंजस आहे की जो त्याच्या मुक्कामाच्या ठिकाणी सत्कर्मे करील. तो स्वत: तर भक्ती करेलच, परंतु त्या घरामध्ये राहणाऱ्या इतरांनादेखील भक्तीमार्गामध्ये आणेल.

या जगामध्ये आपण पाहुणे बनून आलेलो आहोत. येथे राहून आपण शब्द–नामाची कमाई करणे गरजेचे आहे. आपल्या आजुबाजुच्या लोकांना भक्तीमुळे आपल्याला झालेल्या फायद्याची माहिती द्यावी, त्यांच्या जर तो फायदा लक्षात येत असेल तर, त्यांनी देखील भक्ती करावी. आपण कोणाशी वाद–विवाद वा भांडणे करू नयेत. गुरु साहेबांनी जी काही शिकवण आपणांस दिली आहे, त्यानुसार आपण आपले जीवन ढाळले पाहिजे.

**सभना साहिबु एकु है पूरै भागि पाइआ जाई।।**

***

# अनमोल वचन

परमसंत अजायब सिंह महाराजांनी कार्यक्रमाच्या अखेरीस संगतला दिलेला संदेश
संत बानी आश्रम, ॲक्टन – २८ जुलै, १९९६

परमपिता परमात्मा सावन कृपालजींच्या चरणी नमस्कार आहे ज्यांनी अपार दया करून आपल्याला त्यांचा गुणानुवाद करण्याची संधी दिलेली आहे. मला इथे ॲक्टन शहरी येऊन खूप आनंद होतो. आपल्या सर्वांना माहितच आहे कि माता मिली परमात्मा कृपालजींची प्रिय शिष्या होती. तिने परमात्मा कृपालजींच्या शिकवणूकीवर खूप अंमलबजावणी केली होती. इथले प्रेमी तिची आठवण काढतात, मला त्या प्रेमींना भेटून आनंद होतो ज्यांनी माता मिलीची खूप सेवा केली.

अशा गुरू–शिष्यामधिल प्रेमापासून आपण प्रेरणा घेतली पाहिजे, कारण शिष्याच्या अंतरात देखील गुरु असतात, त्यांनीच शिष्याच्या अंतरात प्रेमाचे रोपटे लावलेले असते. माझ्या हृदयात त्या प्रेमींची खूप कदर आहे, ज्यांनी माता मिलीची सेवा केली. त्यांच्याबद्दल कदर असल्याकारणानेच मी जेव्हाकधी संतबानी आश्रमात येतो, तेव्हा मी ॲक्टन येथे येण्याचा प्रयत्न करतो.

मी प्रेमी जीनचा देखील आभारी आहे,जो अगोदरपासूनच माझा कार्यक्रम आखतो. जेव्हा कधी हा मला भेटतो, तेव्हा म्हणतो की आपण जेव्हा कधी अमेरीकेतील संतबानी आश्रमात कार्यक्रम ठेवाल, तेव्हा ॲक्टन शहरात कार्यक्रम जरूर ठेवा. आपण सर्व जाणता की माता मिलीने एका मातेप्रमाणे माझी काळजी घेतली. माता मिली मला सांगत असे की पूर्वी एके दिवशी महाराज कृपालजी मी चहा पिऊन ठेवलेल्या उष्ट्या कपात चहा ओतून प्याले व म्हणाले, ''जो माझ्यानंतर परमार्थाचे काम करणार आहे, त्यास मातेची खूप गरज आहे.'' हे तिने मला राजस्थानात भेटली असता सांगितले तसेच मी तिच्या घरी गेलो असता देखील सांगितले.



जे प्रेमी महाराज कृपालजींच्या निकट राहिलेले आहेत तसेच ज्या प्रेमींनी त्यांचे दर्शन जरी केलेले आहे, त्या प्रेमींसाठी माझ्या हृदयात अत्यंत आदर व प्रेम आहे. ज्या प्रेमींनी महाराज कृपालजींचे दर्शन घेतलेले आहे त्यांचा मी सत्कार करतो. माझ्या गुरूंना माझी जितकी काळजी होती, ती मी वर्णन करून सांगू शकत नाही. त्याकाळी राजस्थानात जे राजकारणातील पुढारी होते, ज्यांचा त्या प्रांतात खूप मान-सन्मान केला जात असे, त्यांच्याकडे जाऊन महाराज कृपालजी त्यांस खूप प्रेमाने म्हणाले की,''माझ्या साहेबाची तुम्ही काळजी घ्या.'' आता आपण कल्पना करू शकता की गुरूंना आपल्या शिष्याची किती चिंता असते? शिष्याची तोच कदर करतो ज्यास आपल्या गुरूंची कदर असते. गुरु अर्जुनदेवजी महाराज म्हणतात:

***जो दीसे गुरु सिखणा तिस निव निव लग्गां पाये जिओ।***
***आखा बिरथा जीअ की मेरा सभे दुख गँवाए जिओ।।***

गुरु रामदासजी महाराज म्हणतात:

***तू आपे गुरु चेला गुरु विच दे तुझे ध्याई।***

तो स्वत:च गुरू आहे व स्वत:च शिष्य आहे. गुरुंद्वारेच परमात्म्याचे ध्यान केले जाते. अध्यापकामध्ये सुद्धा तिच विद्या असते जी विद्यार्थ्यामध्ये असते. फरक केवळ इतकाच असतो की विद्यार्थ्याच्या अंतरात ती विद्या सुप्त असते व अध्यापकामध्ये ती विद्या जागृत अवस्थेत असते. जसजसा विद्यार्थी अध्यापकाची संगत-सोबत करतो, अध्यापकाने सांगितलेले ऐकतो व त्याच्या शिकवणूकीनुसार परिश्रम करतो, तेव्हा विद्यार्थ्याच्या अंतरात सुप्त असलेली विद्या जागृत होते. विद्यार्थ्याच्या अंतरातील विद्या जागृत झाल्यावर त्यास पदवी प्राप्त होते व त्यानंतर अध्यापक आणि विद्यार्थी यांमध्ये कोणताही फरक रहात नाही.

लहान मुलांच्या गोष्टींच्या पुस्तकात ही गोष्ट नमुद केलेली आहे, जीगोष्ट महाराज सावन सिंहजी तसेच महाराज कृपाल सिंहजी देखील आपल्या सत्संगात सांगत असत. एका गावात एक वृद्ध फकीर रहात असे. त्या गावात दुष्काळ पडला. सर्व गावकरी एकत्रित होऊन त्या वृद्ध फकीराकडे गेले व त्यास म्हणाले,''आपण आमच्यासाठी प्रार्थना करा की पाऊस पडू देत व आमच्या शेतात भरपूर पीक येऊ देत.'' वृद्ध फकीर त्यांस म्हणाला,''आपण काही दिवस थांबा, ही परमात्म्याची मर्जी आहे असे मानून तिचा स्वीकार करा.'' ते ऐकल्यावर गावकरी आपाआपल्या घरी परतले.

एके दिवशी त्या गावातील सर्व कुत्रे मेले. पुन्हा सर्व गावकरी एकत्रीत झाले व त्या वृद्ध फकीराकडे जाऊन त्यास म्हणाले,''आपण आमच्या वतीने प्रार्थना करा, आमचे सर्व कुत्रे मृत्यु पावले आहेत.'' त्या वृद्ध फकीराने म्हटले की,''जशी परमात्म्याची मर्जी आहे, त्याप्रमाणे घडले आहे. तुम्ही ही परमात्म्याची मर्जी आहे असे मानून तिचा स्वीकार करा.''

मग त्या गावातील सर्व कोंबडे मेले. पुन्हा सर्व गावकऱ्यांनी त्या वृद्ध फकीराकडे जाऊन पुन्हा तशीच विनंती केली. त्यावर वृद्ध फकीर म्हणाला की,''तुम्ही ही परमात्म्याची मर्जी आहे असे मानून तिचा स्वीकार करा.''

त्याकाळी आजच्यासारखे आधुनिक व वैज्ञानिक युग नव्हते. त्याकाळी आग पेटविण्यासाठी काड्यापेटीचे साधन उपलब्ध नव्हते. दगडावर दगडाचे घर्षण करून आग पेटविली जात असे व सर्वसाधारणपणे त्या आगीस एके ठिकाणी दडवून जपून प्रज्वलीत ठेवले जात असे. जर त्याकाळी आग विझली तर खूप पंचाईत होत असे.

एके दिवशी सर्व गावातील आग विझली तेव्हा गावकऱ्यांनी त्या वृद्ध फकीराकडे जाऊन विनंती केली. तेव्हा वृद्ध फकीर म्हणाला की,''तुम्ही ही परमात्म्याची मर्जी आहे असे मानून तिचा स्वीकार करा. परमात्मा जे काही करतो ते चांगलेच करतो.''

सर्व गावकरी त्रस्त झाले कि पाऊस पडला नाही, शेती सुकून गेली, आमचे कुत्रे मेले, कोंबडे मेले तरी हा फकीर म्हणतो की त्यास परमात्म्याची मर्जी माना, गावातील आग विझली तरी हा म्हणतो की त्यास परमात्म्याची मर्जी माना. प्रत्येक गोष्टीत जर हा परमात्म्याची मर्जी मानून स्वीकारण्यास सांगत आहे, तर मग याच्याकडे जाण्याचा काय फायदा?

काही दिवसांनंतर एक बादशहा गावो-गावी हल्ला करीत, तेथील लोकांची कत्तल करीत त्या गावाच्या दिशेने येत होता. बादशहाने आपल्या लश्करास सांगितले की, ह्या वृक्षांनी आच्छादलेल्या परीसरात पहा, इथे मनुष्यवस्ती आहे का? मनुष्यवस्ती असल्यास कुत्रे भुंकत असावेत? परंतु सर्व कुत्रे तर मेले होते. मग कोंबडे आरवत असतील? परंतु कोंबडे देखील आरवत नव्हते कारण सर्व कोंबडे मेलेले होते.

मग त्याने विचारले की जर मनुष्यवस्ती असेल तर कमीतकमी चुलीच्या आगीचा धूर तरी नक्कीच येत असावा? त्यांनी म्हटले येथे आगीचा धूर देखील दिसत नाही. म्हणून ते दुसऱ्या दिशेने दूर निघून गेले की इथे काही मनुष्यवस्ती नाही, तेव्हा आपण आपला वेळ का व्यर्थ घालवावा.

जेव्हा त्या गावकऱ्यांना समजले की बादशहा ठिकठिकाणी कत्तल करीत आपल्या दिशेनेच येत होता, परंतु जेव्हा त्यास या खूणा आढळल्या नाहीत तेव्हा तो दूरूनच निघून गेला, तेव्हा गावकऱ्यांस त्या वृद्ध फकीरावर श्रद्धा निर्माण झाली. त्यांनी फकीराचे लक्षावधी आभार मानले. संतांच्या सांगण्यामागे दडलेले रहस्य नंतर समजते.

याचतऱ्हेने परमात्मा कृपालजींनी आपणांस परमात्म्याची मर्जी स्वीकारून ती मान्य करण्यावर जोर दिला, की प्रेमींनो पहा, परमात्म्याची मर्जी, त्याचा हूकूम बदलतच नाही, कारण तो अनंत आहे, सर्वाधिकारी आहे. म्हणून आपण त्याच्या मर्जीचा स्वीकार करा; मनुष्यजन्माची कदर करा. सर्व गुरुशिष्य एकत्रित होऊन बसा, सत्य हे आहे की कोणीही परका नाही, कारण सर्वांच्या अंतरात परमात्मा आहे. पशू-पक्षी, मानव-दानव प्रत्येकाच्या अंतरात परमात्मा आहे. तरीही आपण कोणाचा मत्सर करीत असलो, तर आपण परमात्म्याचाच मत्सर करीत असतो. आपण भजन म्हणता-

***कोने कोने ते मैं फिरया, नूर तेरा हर थां मिलया।***
***मैनु तेरे बिना दिस्सदा नां होर दातेया।***

प्रेमींनो, मी कोणत्याही देशात गेलो तरी मला तिथल्या आत्म्यांना भेटून खूप आनंद होतो. जेव्हा मी आपल्या गुरुंना प्रत्येकाच्या अंतरात पहातो, तेव्हा माझा आत्मा धुंद होतो, गुरुंचा धन्यवाद करण्याची संधी मिळते कि कशाप्रकारे त्यांनी समुद्रात, पर्वतांवर, दूर-निकट, पृथ्वीच्या कानाकोपऱ्यात प्रेमाची रोपटे लावलेली आहेत. ते सांगत असत की,''एक बना, नेक बना.'' जेव्हा आपण परमात्म्याशी मिळून एकरूप बनू, तेव्हा आपण नेक बनू व आपले जीवन देखील सुधारू. संतांच्या प्रत्येक वचनात खूप गूढ रहस्य दडलेले असते, खूप खोलवरची सार्थता असते. ज्या प्रेमींनी एकत्रित होऊन इथे कार्यक्रमाची व्यवस्था केली, मी आपले गुरु, परमात्मा सावन-कृपालजींच्या नावाने त्या सर्वांचा आभारी आहे.

***